निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करण्यासाठी नमूना विहित करणे व निवडणूक प्रतिनिधीला छायाचित्र असलेले ओळखपत्र देणेबाबत..

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक:-रानिआ/जिपपस/२०१६/प्र.क्र.२३/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९/१०/२०१६

वाचा :- जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२, नियम २४

## आदेश

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३ के, २४३झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका मुदतीत, निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडणे तसेच या निवडणुकांचे नियंत्रण, संचलन व अधिक्षण करण्याची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता व सुसूत्रता आणण्याकामी आवश्यक त्या सर्वतोपरी उपाययोजना करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. सबब संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियम/नियमातील तरतुदीमध्ये काही कमी असल्यास तेथे आदेश काढण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत.

३. जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२, नियम २४ मध्ये निवडणूक प्रतिनिधी यांच्या नेमणुकीबाबतच्या तरतुदी विषद करण्यात आल्या आहेत. तसेच हि नेमणूक करणेकामी नमुना-५ विहित करण्यात आलेला आहे.

४. नियम २४ (२) नुसार, अशी निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक जर एखाद्या उमेदवारास, निवडणूक प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करावयाची असल्यास, उमेदवाराने घोषणापत्राद्वारे निर्वाचक अधिकाऱ्यास कळविणे आवश्यक आहे. परंतु सदर घोषणापत्राचा नमुना देण्यात आलेला नाही. तरी या प्रक्रियेत सुलभता यावी यादृष्टीने या आदेशासोबत नमुना विहित करण्यात येत आहे.

५. सदर नमुन्याद्वारे घोषणापत्र प्राप्त झाल्यास निर्वाचक अधिकाऱ्याने त्यावरील उमेदवाराच्या सहीची खात्री करावी व नंतर अशी प्राप्त नोटीस (घोषणा पत्र) स्विकारावी.

ज्यादिवशी सदरची नोटीस प्राप्त होईल त्या दिवसापासून निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तशी पोहच तारीख व वेळ टाकून निर्वाचक अधिकारी सहीने देईल.

६. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का.५, दि.८/१/२०१५ नुसार सदर घोषणापत्र स्टॅम्प पेपरवर करण्याची आवश्यकता नाही.

७. याच अनुषंगाने, निवडणूक प्रतिनिधींना छायाचित्र असलेले ओळखपत्र द्यावयाची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. सबब नमुना-५ (निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करणे) वर उजव्या बाजूस कोपऱ्यात निवडणूक प्रतिनिधीचा फोटो लावण्यात यावा व निर्वाचक अधिकाऱ्याने तो साक्षांकित करावा. सदरचा नमुनाच ओळखपत्र म्हणून वापरावे.

नमुना-५ (फोटोसहित) दोन प्रतीत घेण्यात यावे. एक ऑफीस रेकॉर्डला ठेवून दुसरे ओळखपत्रासारखे निवडणूक प्रतिनिधीस द्यावे.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-१
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
५) निवड नस्ती

## नमुना
## (नियम २४ पहा)
## निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करणेबाबत

---------------- जिल्हा परिषद / पंचायत समिती, ---------------------------- निवडणूक विभाग/ -----------निर्वाचक गण सार्वत्रिक / पोट निवडणूक-------

प्रति,
निर्वाचक अधिकारी,
----------------निवडणूक विभाग/निर्वाचक गण

मी, श्री/श्रीमती-------------------------------------- राहणार--------------- उपरोक्त निवडणुकीकरिता नमुना-५ द्वारे नेमण्यात आलेले माझे निवडणूक प्रतिनिधी श्री/श्रीमती-------- ------------ यांची नेमणूक रद्द केल्याचे घोषित करतो.

स्थळ :-
दिनांक :- / /

उमेदवाराची सही

---

## नमुना-अ

उमेदवार श्री/श्रीमती---------------------------------------------- यांनी आपले निवडणूक प्रतिनिधी श्री/श्रीमती------------------------------------------------ यांची नेमणूक रद्द केल्याचे घोषणापत्र मला समक्ष दि.-------------------- वेळ---------------- कार्यालयीन ठिकाणी दिले.

स्थळ :-
दिनांक :- / /

निर्वाचक अधिकाऱ्याची सही
-------------- निवडणूक विभाग/निर्वाचक गण